# शिक्षण : भारताबाहेरचे चित्र

## चन्द्रशेखर पुरन्दरे

शिक्षणाचा अभाव आणि दारिद्र्य यांचा परस्परसंबंध जगभर मान्य झालेला आहे. शिक्षणाकडे वळण्याआधी दारिद्र्यावरचे सध्याचे चिंतन लक्षात घेऊ.

दारिद्र्य म्हणजे फक्त आर्थिक दारिद्र्य नसते. अमुक इतके किमान उत्पन्न किंवा दारिद्र्यरेषा हे संपूर्ण दारिद्र्याचे केवळ एक परिमाण आहे. अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्य ही जास्त विस्तृत व सखोल संकल्पना आहे. एखाद्या व्यक्तीच्या बृहत् समाजात सहभाग घेण्याचा मार्गातील अडथळे म्हणजे दारिद्र्य. जे जे घटक हे अडथळे निर्माण करतात, ते सगळे दारिद्र्याला कारणीभूत असतात. शिक्षणाने केवळ साक्षरता येते असे नाही तर दारिद्र्याचा सामना करण्याची इतरही प्रमुख साधने उपलब्ध होतात असा सध्याचा शिक्षणाबाबत विचारप्रवाह आहे. दारिद्र्यात दोन प्रकार मानले जातात. एक म्हणजे भारतातल्या कालाहंडीसारख्या, परिसरातील निखळ दारिद्र्य (absolute poverty), दुसरे म्हणजे सापेक्ष दारिद्र्य (relative poverty). निखळ दारिद्र्य मोजणे सोपे असते. संयुक्त राष्ट्रसंघाचा मोजमापानुसार दरडोई दरदिवशी एक किंवा दोन अमेरिकन डॉलर्सपेक्षा (४५ किंवा ९० रुपये) कमी उत्पन्न असल्यास ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली म्हणजे निखळ दारिद्र्यात असते. सापेक्ष दारिद्र्य आकड्यात मोजणे कठीण असते. व्यक्ती ज्या समाजात राहते, त्या समाजाच्या मुख्य प्रवाहाचे किमान जीवनमान, त्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची व्यक्तीची शक्यता इत्यादी घटक त्या व्यक्तीचे त्या समाजातील सापेक्ष दारिद्र्य ठरवतात. ही कल्पना भारतासारख्या विकसनशील देशापेक्षा युरोप-अमेरिकेतील विकसित देशांना जास्त लागू पडते. कारण तेथे निखळ दारिद्र्य अगदीच अभावाने आढळते. सापेक्ष दारिद्र्याचा विचार लेखाच्या दुसऱ्या भागात केला आहे.

निखळ आणि सापेक्ष या दोन्ही प्रकारचे दारिद्र्य शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाचे ठरते. भारतासारख्या देशात निखळ दारिद्र्याच्या परिणामावर बरीच चर्चा सतत होत असते. अशा घरात बहुधा आई-बाप अशिक्षित असतात. शिक्षणासाठी मुलाला शाळेत घालणे यात शाळेची फी बाजूला पण युनिफॉर्म, जाण्यायेण्याचा, पुस्तके विकत घेण्याचा खर्च परवडण्यातला नसतो. घरी वीज बहुधा नसते. त्यामुळे घरी अभ्यास करता येत नाही. मूल हे अर्थार्जन आणि घरकाम याला उपयोगी असणारे दोन हात असतात. त्यातही मुलीवर हा भार पुरुषप्रधान संस्कृतीमुळे जास्त पडतो. पाणी भरणे, इंधन गोळा करणे, स्वयंपाक, कपडे धुणे, भांडी घासणे ही कामे मुलीवर पडतात. तर मुलगे शेतकाम, बांधकाम किंवा इतर मजुरीसाठी आवश्यक असतात. शिक्षण देऊन मिळणाऱ्या भावी मिळकतीपेक्षा वर्तमानातील ही गरज जास्त तातडीची ठरते. वस्तीतील वातावरणही शिक्षणाला बहुधा पोषक नसते.

भारतातील काही भागांइतके, किंबहुना जास्त निखळ दारिद्र्य आफ्रिका खंडातील अनेक देशांत आहे. हिंस्र वांशिक युद्धे, मोठ्या प्रमाणावर व सतत चालू असलेल्या दुष्काळांसारख्या नैसर्गिक आपत्ती व अस्थिर आणि कमालीची भ्रष्ट सरकारे यामुळे या दारिद्र्यावर दीर्घकालीन उपाययोजनाही होत नाहीत. सामाजिक अशांततेचा अनिष्ट परिणाम शिक्षणावर होतो. सुदान हा आफ्रिकेतील एक देश, शिक्षणाच्याबाबत जगात तळात असावा. या देशातील फक्त अकरा मुलींनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ही सरकारी आकडेवारी आहे. यावरून गंभीर परिस्थिती लक्षात यावी.

सुदानची एकूण लोकसंख्या सव्वाचार कोटी आहे. आकाराने आफ्रिका खंडातील सगळ्यात मोठा देश आहे. भारतापेक्षा जरा लहान आहे. उत्तर सुदानमध्ये प्रामुख्याने अरबवंशीय मुस्लिमांची वस्ती आहे. दक्षिण सुदानमध्ये आदिम जमाती व ख्रिश्चन अशी कृष्णवर्णीयांची वस्ती आहे. दक्षिण सुदान पाणी व नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असल्याने त्याचे आर्थिक शोषण सत्ताधीश उत्तर सुदानी करत आलेले आहेत. यामुळे या दोन प्रदेशांत गेली अनेक वर्षे वांशिक युद्धे चालू आहेत. त्यात दक्षिण सुदानमधील लाखो लोक बेघर झालेले आहेत व त्यात भर पडत आहे. या विस्थापनाचा मुलांच्या शिक्षणावर कायमचा दुष्परिणाम होतो. मेरिअल बे नावाच्या खेड्यातील परिस्थिती एकूण सुदानमधील ग्रामीण भागासारखी आहे. या खेड्यात वीज नाही, नळाचे पाणी नाही. जवळात जवळचा पक्का रस्ता २०० किलोमीटर दूर आहे. पण या खेड्यात वॅलेंटिनो नावाच्या तरुणाने आता शाळा सुरू केली आहे.

वॅलेंटिनो मूळचा या खेड्यातला. काही वर्षांपूर्वी वांशिक युद्धामुळे त्याची आई-वडिलांपासून फारकत झाली. मग उत्तर सुदानच्या मारेकरी सैनिकांना टाळत, हिंस्र श्वापदांना टाळत, युद्धात रस्त्यात पेरलेले सुरूंग टाळत तो निर्वासितांच्या एका गटाबरोबर रानोमाळ भटकला. कधी झाडपाला खात तर कधी उपाशीपोटी त्याचा प्रवास एका निर्वासितांच्या कँपपर्यंत आला. तेथे अक्षरश: धुळीत काडीने अक्षरे काढत त्याने अक्षरओळख करून घेतली.

२००१ साली त्याला अमेरिकेत निर्वासित म्हणून प्रवेश मिळाला. तेथे त्याने जिद्दीने कॉलेजपर्यंत शिक्षण घेतले. त्याचे आत्मचरित्रही इंग्रजीत प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या विक्रीतून मिळालेला पैसा, अमेरिकेतील काही स्वयंसेवी संघटनाकडून वैयक्तिक देणग्यांतून मिळवलेला पैसा जमा करून त्याने वर्षांपूर्वी या खेड्यात आता शाळा काढली आहे.

वीज पुरवठा नसल्याने जनरेटर्स किंवा सौरशक्तीवर शाळा चालेल. शाळेला पुस्तकांची लायब्ररी नाही. परदेशांतून पुस्तके देणगी द्यायला लोकांची तयारी आहे. पण पोस्टाची सेवाच या

गावापर्यंत उपलब्ध नाही. शाळा मोफत शिक्षण देईल पण शाळेची साफसफाई, इतर मेटेनन्सची कामे विद्यार्थ्यांना करावी लागतील. शिवाय इतर विस्थापितांसाठी घरे बांधणे, गावात इतर सुविधा पुरवण्याचा कामात मदत करणे ही कामेही विद्यार्थी करतील. शिकवायला अमेरिकेहून स्वयंसेवी शिक्षक येतात. त्यांना बादलीतून पाण्याने आंघोळ करणे, पाटीचा संडास वापरणे या गोष्टींची सवय नसते. शाळेच्या कँटिनचे आचाऱ्याचे काम एक महिला करते. ती १९८६ साली सात वर्षांची असताना गुलामांचा व्यापार करणाऱ्या टोळीने तिला पळवले आणि वीस वर्षे उत्तर सुदानमध्ये गुलाम म्हणून डांबून ठेवले. शेवटी एका स्वयंसेवी संघटनेने तिला त्या जाचातून सोडवले आणि आता ती या शाळेत आहे.

या शाळेला आता एक वर्ष झाले. नव्या वर्षासाठी १५० जागा आहेत. शाळेचे स्वत:चे वसतीगृह असल्याने त्याहून जास्त मुले ठेवली जात नाहीत. अनाथ मुलांना प्रवेशाचे प्राधान्य आहे त्याबरोबरच किमान ५० टक्के मुली असतील असे वॅलेंटिनोने ठरवले आहे. सुदानची सामाजिक परिस्थिती इतकी वाईट आहे की तेथे मुलगी प्राथमिक शिक्षण घेण्याऐवजी, पुढे बाळंतपणात मृत्यू पावण्याची शक्यता जास्त असते. या पार्श्वभूमीवर हे 'आरक्षण' लक्षात घ्यावे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाचा उपक्रम कसा राबवला जाऊ शकतो याचे हे उदाहरण आहे.

आता विकसित देशातील शिक्षणाचा आढावा घेऊ. विकसित देशाला ५ ते १६ किंवा अठरा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे असते. प्रत्येक नागरिकाची अद्ययावत नोंद सरकारकडे असते. त्यामुळे एखाद्या घरातील एखादे मूल पाचव्या वर्षानंतर शाळेत जात नाही असे लक्षात यायला वेळ लागत नाही. मग समाजसुरक्षा खाते तातडीने हालचाल करून मुलाला जवळच्या शाळेत दाखल करते. त्यामुळे शाळा टाळणे शक्य होत नाही. संपूर्ण शालेय शिक्षण सरकारी शाळेत मोफत असते. या शाळांचा दर्जा चांगला असतो. आपल्याकडच्या सरकारी शाळा व खासगी शाळा यातील दर्जात लक्षणीय तफावत असते. ती येथे आढळत नाही. ब्रिटनमधील ९३ टक्के मुले सरकारी शाळांतच शिकतात. ब्रिटन हा विकसित देश आहे. तो विकसित राखण्यात जवळजवळ संपूर्ण वाटा या शाळांमधून शिक्षण घेतलेल्या नागरिकांचा आहे. त्यावरून शाळाच्या दर्जाची कल्पना यावी. उरलेली ७ टक्के मुले खासगी शाळांत शिकतात. तेथे फी भरावी लागते. भारतीय रुपयांत ही फी दहा लाख रुपये वर्षाला येईल. म्हणजे, आपल्याकडे अलीकडे आलेल्या अंबानींच्या शाळांशी या शाळांची तुलना करता येईल.

या शालेय शिक्षणानंतर तीन किंवा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम व नंतर दोन वर्षांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम असतो. महाविद्यालयीन व विद्यापीठाच्या शिक्षणाला फी घ्यावी लागते. मात्र, सरकारी अनुदानामुळे ही फी देणेही परवडणार नाही. त्यांच्यासाठी स्वस्त व्याजदराने किंवा मोफत कर्जे उपलब्ध असतात. शिक्षण संपल्यावर नोकरी सुरू झाली की हे कर्ज फेडायचे असते. 'डोनेशन'च्या शिक्षणसंस्था इथे नसतात.

विकसित देशांत निखळ दारिद्र्य नसल्याने सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना महत्त्वाची ठरते. उदाहरणार्थ, बांगलादेशातील एखादा मध्यमवर्गीय येथे गरीब गणला जाईल. सापेक्ष दरिद्री वर्गाशी समाजातील मुख्य प्रवाह सामाजिक अभिसरण टाळतो. या वर्गाशी समाजाच्या परिघावर अडकण्याची कारणे निरनिराळी असतात. शिक्षणाचा अभाव, त्यामुळे सुसंस्कृत भाषा बोलता न येणे, कमी मिळकत व जीवनपद्धती, वगैरे. विकसित देशांत गरीब घरांतून आलेल्या मुलांचे शिक्षणावर लक्ष नसण्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणाने आपल्या परिस्थितीत, फार फरक पडेल यावरच त्यांचा विश्वास नसतो. शहरातील गरीब वस्तीतील शाळांमध्ये अशी मुले बहुधा जातात. (येथे हव्या त्या सरकारी शाळेत जाता येत नाही. तुम्ही राहता त्या ठिकाणाजवळची शाळाच घ्यावी लागते.) मग बरोबरीच्या मुलांच्या वर्तणुकीचा परिणामही या मुलांवर होतो. बऱ्या घरातल्या मुलांपेक्षा या मुलांना पालकांची मदतही शिक्षणाबाबत कमी असते. याचे कारण, परत, आपण मुख्य प्रवाहात नाही ही जाणीव पालकांच्यात भिनलेली असते. घरात अभ्यासाला उपयोगी पुस्तके कमी असतात. वातावरण अभ्यासाला पोषक नसते. गरीब घरातील विद्यार्थ्यांना शिकवणे जास्त कठीण असते. गरीब घरातील विद्यार्थ्यांना शिकवणे जास्त कठीण असल्याने शिक्षक अशा शाळा टाळतात. आपल्याकडच्या सारखाच शहरी-ग्रामीण हा भेद येथेही दिसतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन मागासलेल्या भागात शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार अनेक उपक्रम राबवते. अशा विभागात आर्थिक समाजसेवक पाठवले जातात. पालकांसाठी मुलांना शाळेच्या अभ्यासात कशी मदत करावी याचे खास वर्ग घेतले जातात. प्रौढ-साक्षरतेचेही वर्ग घेतले जातात. जेणेकरून घरगुती वातावरण मुलांचा शिक्षणातील रस टिकून रहायला व वाढायला मदत होईल. तरीही, अमेरिकेतील एका अभ्यासानुसार गरीब भागातील शाळांमध्ये दीर्घकालीन प्रगती झाल्याचे आढळलेले नाही. बऱ्याच वेळा अशा शाळाच 'बहिष्कृत' होतात. अमेरिकेतही शिक्षणपद्धती जवळपास युरोपसारखीच आहे. युरोपसारखेच गरीब गोरे, स्थलांतरित, निराळ्या वर्णाचे गरीब लोक, इंग्रजी न येणारे परदेशी यांना एकूण शिक्षणव्यवस्थेचा मुख्य प्रवाहाइतका उपयोग होत नाही. आज एकूण लोकसंख्येच्या जवळ जवळ १४ टक्के अमेरिकन जेमतेम साक्षर म्हणता येतील इतपतच शिक्षित आहेत. अल्पसंख्यांकांवर सापेक्ष दारिद्र्याचा परिणाम बहुसंख्यांकांमधल्या गरीबांपेक्षा जास्त होतो. त्यांना एक तर शाळांमध्येही हलकी वागणूक दिली जाते आणि मुख्य प्रवाहाशी सांस्कृतिक देवघेव नसल्याने त्यांची मिळकत वाढली तरी ते परिघावरच राहतात. अशा परिस्थितीत मुलांची शिक्षणानंतर मुख्य प्रवाहात सामील होण्याची क्षमताही कमी होते. गरीब वर्गातील मुले मध्यमवर्गीय शाळांत गेली तरी त्यांना इतर विद्यार्थी बरोबरीचे मानत नाहीत. हल्लीच्या काळात मिळणारी व दर दोन महिन्यांनी

बाजारात नवी येणारी महागडी इलेक्ट्रॉनिक खेळणी परवडणे, सुट्ट्यांसाठी परदेशी जाणे, आई-बापांच्या महागड्या मोटारी असणे, पार्ट्या, महागडे कपडे वगैरे गोष्टींवरून विकसित देशांत श्रीमंत-गरीब वर्ग ठरतात. एकाच शाळेत असले तरी हा वर्गभेद गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हानिकारक ठरतो. कारण एक न्यूनगंड निर्माण होतो. त्यामुळे शिक्षणाहून जेवढे ग्रहण करता येईल, ती ग्रहणशक्तीच कमी होते. पुढील आयुष्यात अशा मुलांना कागदोपत्री तीच शैक्षणिक पात्रता असली तरी आत्मविश्वास नसणे, अभिव्यक्ती कमकुवत असणे अशा कारणांमुळे नोकऱ्या मिळणेही कठीण जाते.

विकसित देशांतील दुसऱ्या टोकाचे उदाहरण म्हणजे अतिशय बुद्धिमान विद्यार्थ्यांना दिली जाणारी विशेष वागणूक. उद्याच्या जगातील आघाडीचे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञही अमेरिका शिक्षणपद्धतीतून निर्माण करते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सरकारी शिक्षणाचे नियोजन, निदान कागदावर तरी समाजातील सगळ्यात दुबळ्या घटकाचा समावेश व्हावा या दृष्टीने केलेले असते. पण शासकीय धोरण म्हणून बुद्धिमान विद्यार्थ्यांकडेही विशेष लक्ष पुरवले जाते. त्यासाठी खासगी उद्योग मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत करतात. खास प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके उपलब्ध करून देतात. उदाहरणार्थ, कॉम्प्युटरमधील एक अतिशय महत्त्वाचा भाग बनवणारी इंटेल नावाची एक अमेरिकन कंपनी आहे. विज्ञानातील मूलभूत संशोधनासाठी ती कंपनी अतिबुद्धिमान मुले निवडते व त्यांना संशोधनाच्या सोयी उपलब्ध करून देते. या वर्षी अशी चाळीस मुले विशेष शिष्यवृत्तीसाठी निवडण्यात आली. त्यातील निम्म्याहून जास्त स्थलांतरित चिनी किंवा भारतीयांची आहेत.

शैक्षणिक यशामागची गुंतागुंत या उदाहरणावरून लक्षात यावी. ही मुले त्यांच्या देशात असती तर ती इतक्या झपाट्याने इतक्या आघाडीवर पोचणे कठीण होते. अमेरिकेच्या बृहत् समाजातील मूल्यव्यवस्था व घरगुती आशियन मूल्यव्यवस्था यांच्या सुदैवी संयोगाने ती यशस्वी झाली म्हणजे, एकीकडे अमेरिकेत स्थलांतरितांविरुद्ध सार्वत्रिक वातावरण वाढते आहे. दुसरीकडे,त्या समाजातील बहुसंख्य, म्हणजे गोरे अमेरिकन, उच्च शिक्षणात मागे पडताना दिसतात. त्याच व्यवस्थेच्या सवलती मिळवून स्थलांतरित त्यांच्या पुढे जाताना दिसतात. अमेरिकन भांडवलशाहीने साम्राज्यवादाला पोषक अशा गोऱ्यांच्या पिढ्या आजवर निर्माण केल्या, का भांडवलशाहीने उच्चशिक्षितांचा वापर साम्राज्यवादासाठी केला, हा प्रश्न निराळा पण आता तरी परिस्थिती बदलताना दिसते. एकूण चित्र पाहता पुढील गोष्टी दिसतात. दारिद्र्य आणि शिक्षण यांचा एकरेषीय कार्यकारणभाव दिसत नाही. अनेक पातळ्यांवर अनेक प्रकारे या प्रश्नाचा अभ्यास होणे जरूरीचे आहे. तरीही, शिक्षणाने दारिद्र्य कमी होते हा जगभरचा अनुभव आहे. फक्त प्राथमिक शिक्षणाने ते कमी होते की त्याला माध्यमिक शिक्षणाचीही जोड लागते हे अजून स्पष्ट नाही. एकीकडे सुदान, अफगाणिस्तानसारखे देश अत्यंत मागासलेले आहेत तर शासकीय पुढाकाराने पश्चिमेतील देश, दक्षिण-पूर्व आशियातील देश आघाडीवर आहेत. हेच देश जागतिक सत्तेची दिशाही ठरवत आहेत.

आणखी एक जुजबी निष्कर्ष म्हणजे विकसित देशातील शिक्षणपद्धती आजवर तरी म्हणजे गेल्या शतकात तरी वर्गव्यवस्था मूलत: बदलण्यात यशस्वी झालेली नाही. किंबहुना आहे ही व्यवस्था बळकट कशी होईल, किंवा निदान आहे तशी चालू तरी कशी राहील या दिशेनेच शिक्षणाचे धोरण आहे व राबवले जात असल्याचे दिसते.

सगळा समाज साक्षर झाला तरी वर्गव्यवस्था काही बदलत नाही. त्याचे एक कारण असे वाटते की तंत्रज्ञानाची किंवा उद्योगाची किमान गरज साक्षरतेने भागते. ती भागली की हव्या त्या पात्रतेचा कनिष्ठ श्रमिक वर्ग मिळतो. मग त्या वर्गाच्या नंतरच्या प्रगतीत तंत्रज्ञानाला किंवा उद्योगाला रस राहत नाही. भांडवलशाहीत सत्तेचे धोरण उद्योगधंदे ठरवत असल्याने, किमान लोककल्याणाइतपतच सरकारी धोरण मर्यादित राहते. वर्गव्यवस्था बलदण्याचा धोका शिक्षणाने निर्माण झाला तर तो सत्ताधीशांना पत्करायचा नसतो.

आपल्याकडच्या शैक्षणिक धोरणांची संभाव्य वाटचाल यावरून लक्षात यावी.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❐